**RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC**

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**Volume. III, Issue III (A)**
***Oct. to Dec. 2019***

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chanceller Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

# Guidelines for Writers

- "Power of Knowledge" the referred research journal has permission and registered of RNI, Ministry of Information and Broadcasting, Govt, of India.

  Research papers in all subjects of all faculties in Hindi, English, Marathi will be published in "Power of Knowledge".
- Research scholars should sent their papers in Marathi, Hindi and English on one side typed papers. It should be in Pagemaker or word format with a CD. Scholars should send their papers through registered / speed post. A Xerox copy of papers should be enclosed.
- The writer should give a letter of undertaking that he / she has not violated copy right act and the whole responsibility will not be liable of any legal action. This undertaking is compulsory with the research paper.
- Directions regarding fonts

  English **Times New Roman or any 12** font

  Hindi & Marathi **ISM DVB TT- Surekh Pagemaker, Font 14**
- Research paper should be in A-4 size upto 4-5 pages, value language and references should be mentioned.
- There should not be grammatical mistakes.
- If the research paper published in "Power of Knowledge" not accepted by Research Recognition Committee/University Body/other research related committees, the Editor/Printer/Publisher will not take any responsibility of the same.
- All the postal contact should be to the address of editor through registered post only.
- Despute shall be subject to hearing at Hon'ble BEED (M.S.) Jurisdiction only.

Ideas expressed in "Power of Knowledge" belongs to the writer exclusively. The editor, publisher & printer of "Power of Knowledge" have nothing to do it with them. At the same time it is made clear that if writers violate copyright act, they will be responsible for their own action. Hence, it is clarified from editor, publisher and printer's side.

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | Sanskrit : A Scientific Language | Dr.Sanjivani Shripad Nerkar | 7-9 |
| 2 | AN EMPIRICAL STUDY OF AGRICULTURAL LABOUR IN INDIA | Dr.Khande Sominath Sarandhar | 10-13 |
| 3 | Causes of Climate Change in Globalized World | Dr.Jitendra Ghodke | 14-17 |
| 4 | Assessment of the Problem of Building Basement Water : A case study of shirur town, in Pune district, Maharashtra. | Dr.Atul M.Jethe | 18-22 |
| 5 | "Effect of wave dynamics on the morphology of sandy beaches at village Borya & Kondkarul (South Facing) In Guhagar Taluka, Ratnagiri District, Maharashtra." | Prof.Ankush Manaji Pawar | 23-30 |
| 6 | Globalization and its impact on Literacy rates in India. | Mr.Usar Bharat Rupchand | 31-34 |
| 7 | Darwin's Theory of Evolution | Dr.Achole P.B. | 35-41 |
| 8 | Natural vegetation and Ecosystems | Dr.More Vijaykumar V. | 42-49 |
| 9 | टोकरे कोळी आदिवासी जमातीचे गुणवैशिष्ट्ये | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 50-53 |
| 10 | स्वरुप आणि व्याप्ती | प्रा.डॉ.अशोक घोळवे | 54-59 |
| 11 | मराठी आख्यानकाव्य व संस्कृत आख्यानकाव्य : साहित्यानुबंध | वैशाली गुलाबराव मून | 50-54 |
| 12 | मराठवाडयतील कादंबरी लेखन एक अभ्यास | प्रा.डॉ.अशोक घोळवे | 55-57 |
| 13 | जागतिकीकरण व मराठी कविता | प्रा.डॉ.संगीता ग. घुग | 58-63 |
| 14 | मराठी लोकसाहित्य आणि लोकगीते : एक अभ्यास | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 64-67 |
| 15 | डोंगरातलं देऊळ : बदलत्या ग्रामसंस्कृतीचे वास्तव दर्शन | प्रा.डॉ. संजय शिंद | 68-70 |
| 16 | रोमॅंटिसिझमशी नाते सांगणारी बालकवींची कविता | प्रा.डॉ.वैशाली रोकडे | 71-75 |
| 17 | स्त्री अत्याचार विषयी भारतीय मानसिकता | प्रा.डॉ. अनितता द. वाळके | 76-80 |
| 18 | मी पणाचा अविष्कार मरुद्गान | प्रा. मंजुळा दुल्लभ साळवे<br>प्रा.डॉ. फुला. बागुल | 80-84 |
| 19 | "ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील विद्यार्थिनीचा मानसिक स्वास्थाचा अभ्यास" | डॉ. वाटोरे एस. एम.,<br>खाडे वंदना भिमराव, | 85-90 |
| 20 | मी पाहिलेला देव ! | डॉ.अशोक मधुकरराव मुसळे, | 91-92 |
| 21 | ग्रामिण स्त्रियांच्या समस्या :एक अभ्यास | डॉ. चंद्रशेखर पाटील | 93-96 |
| 22 | ग्रंथालय आणि वाचन सवयी | डॉ.दिलीप गोविंदा पाटील | 97-103 |

# ग्रंथालय आणि वाचन सवयी

**डॉ.दिलीप गोविंदा पाटील**

ग्रंथपाल

को.ए.सो.लक्ष्मि-शालिनी महिला महाविद्यालय, पेझारी, ता.अलिबाग जि.रायगड

**सारांश :**

*"वाचणे हा एक उत्तम सवय आहे. वाचन वेगवेगळया भाषेत करता येते. मातृभाषेतून केलेले वाचन वाचायला आणि समजायला सोपे जाते. मराठीतून वाचन करण्यासाठी भरपूर साहित्य उपलब्ध आहे. वाचनाने माणूस ज्ञानी होतो आणि त्याला पुस्तकाच्या रूपाने एक नवीन मित्र मिळतो. वाचन ही एक कला आहे. वाचन माणसाला माणूस बनविते, जीवनाला एक नवी दिशा देते, विचार करायला शिकविते, अंतर्मुख करविते, त्याचप्रमाणे जीवनात योग्य- अयोग्य काय याची जाणीव करून देते. प्राचीन काळामध्ये मनुष्याच्या पुढे जीवन जगणे हा एकमात्र विचार होता. प्राचीन काळात जीवन जगण्याच्या व्यतिरिक्त, ते जीवन खूप चांगल्या प्रकारे जगले पाहिजे अश्या प्रकारचा उद्देश कमी प्रमाणात होता. त्याकाळात मानवाच्या गरजाही सीमित होत्या. जीवन जगण्यासाठी अन्न, पाणी आणि निवारा या शिवाय मानवाकडून खूप काही अपेक्षा नसायच्या आणि या गरजेसाठी तत्कालीन मनुष्य नेहमी प्रयत्नशील असायचा. परंतु जसा जसा काळ बदलत गेला तसा तसा मनुष्याच्या विचार करण्याच्या पद्धतीतही बदल होत राहिले. तेव्हाच्या काळात ज्या प्रकारच्या समस्या मनुष्याला येत होत्या. उदा. जंगली प्राण्यापासून स्वतःचे व कुटुंबाचे संरक्षण करणे, आगीपासून संरक्षण करणे, शत्रू पासून संरक्षण करणे यासाठी तो माहिती व ज्ञान प्राप्त करण्याच्या प्रयत्नातून त्यांच्यात वाचन सवय निर्माण होत गेली आणि ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा वाढत गेली.. आधुनिक काळात मनुष्याच्या जीवन जगण्यासोबतच ते चांगल्या प्रकारे जगले पाहिजे असं विचार दृढ होत गेला. जिज्ञासा वाढत गेली, शिक्षणाचा प्रचार व प्रसार होत गेला. तंत्रज्ञान विकसित झाले आणि मनुष्याच्या निर्मिती पासूनचा, निसर्गाच्या निर्मितीपासूनचा इतिहास अभ्यासण्याची ओढ वाढत गेली. ग्रंथ आणि ग्रंथालयाच्या प्रगतीमुळे हे ज्ञान मिळविणे शक्य होत गेले आणि सुविधा उपलब्ध होवू लागल्या. विविध वाचन साहित्य निर्माण झाले. संशोधनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आणि वाचन अभिरुची आजच्या वाचकांमध्ये निर्माण झाली. प्रस्तुत लेखात वाचन अभिरुची आणि ग्रंथालय व ग्रंथालयातील वाचनकक्षाची उपलब्धता याचा संक्षिप्त आढावा घेतलेला आहे."*

**प्रस्तावना:**

मानवी इतिहासाचे एक वैशिष्ट्ये असे आहे की, कोणताही मनुष्य आपल्याजवळ असलेल्या ज्ञानाचे, विचाराचे, अनुभवाचे, संप्रेषण करत असतो. म्हणजेच असे म्हणता येईल की, मानवी

विचार किंवा ज्ञान हे नेहमीच एका व्यक्ती कडून दुसऱ्या व्यक्तीकडे व एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे संप्रेषित होत राहते. आणि विचाराच्या व ज्ञानाच्या या संप्रेषनामुळे संस्कृती विकसित होत राहिली आहे. प्रत्येक मनुष्याची नवीन ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासा, आणि वर्तमान काळात ग्रंथालये व मानवाचा विकास या गोष्टी एकमेकीना पूरक आहेत तसेच एकमेकीवर अवलंबून आहेत. ज्ञानाबद्दलची जिज्ञासा पुरविण्यासाठी आणि ज्ञान संग्रहित करण्यासाठी वर्तमान स्थितीत जे अनेक मार्ग आहेत त्यापैकी वाचन हा एक प्रमुख मार्ग आहे. वाचनाची आवड निर्माण झाली की वाचनाची सवय वाढत राहते. वाचनाची गरज वाढत राहते. ती गरज भागविण्यास ग्रंथालये मदत करतात. एवढेच नव्हे तर बालकांपासून प्रौढांपर्यंत सर्वांनाच वाचनाची सवय लागावी यासाठी विविध प्रकारची ग्रंथालये नेहमीच प्रयत्नशील असतात. कारण वाचनाच्या वाढत्या सवयीमुळे ग्रंथालयाचा खऱ्या अर्थाने पूर्ण उपयोग होत असतो. म्हणूनच ग्रंथालय आणि वाचन सवय या दोन बाबी मानवी आयुष्यात महत्वाच्या आहेत.

**प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश:**

प्रस्तुत संशोधन लेखाचे उदिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. वाचकांच्या वाचन सवयी संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. वाचनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयातील सुविधांचा अभ्यास करणे.

**प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्याची संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केलेला असून विविध प्रकाशकाकडून प्रकशित करण्यात आलेल्या ग्रंथाचा अभ्यास केलेला आहे व त्या अभ्यासातून संशोधन लेखाच्या शीर्षकाची उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता संबंधित प्रकाशित ग्रंथातून व संदर्भ ग्रंथातून ह्या संकल्पना समजून संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत. माहिती संकलनासाठी संशोधनाच्या प्राथमिक साधनाचा अवलंब केला असून आवश्यकतेनुसार ग्रंथालय वाचकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. उपलब्ध झालेल्या माहितीचे विश्लेषण केलेले आहे व शेवटी निष्कर्ष दिलेला आहे.

**ग्रंथ:**

मानवाच्या भावभावना, कल्पना, विचार, अनुभव व ज्ञान अक्षरबद्ध करून ज्यात ग्रथित केलेले असते, त्याला स्थूल मानाने ग्रंथ असे संबोधिले जाते. आधुनिक कल्पनेनुसार ग्रंथ म्हणजे कागदावर लिहिलेल्या किंवा मुद्रित केलेल्या अनेक सुट्या वा बांधलेल्या पृष्ठांचा संग्रह होय. हलक्या पण टिकाऊ वस्तूवर लिहिलेला, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुलभतेने नेता येण्याजोगा व ज्यातील लेखन समाजासाठी वाचकांसाठी असते, अशा सुसंगत अर्थाच्या वाक्यांचा 'रचनाविशिष्ट समुदाय' अशी ग्रंथाची व्याख्या केली जाते. जुन्या संस्कृत भाषेत आणि जुन्या मराठीत बत्तीस वर्ण असलेला अनुष्टुभ् छंदातील श्लोक, समग्र वर्णसमूह, गद्यातील अथवा पद्यातील पोथी, पुस्तक, शास्त्र या अर्थीही ग्रंथ ह्या शब्दाचा वापर झालेला दिसतो. संस्कृत भाषेत ग्रंथाला 'पुस्त' असे पर्यायी नाव आहे. त्याचा अर्थ 'घडण' किंवा आकार देणे असा आहे. भाजलेल्या विटा, शिला व धातूंचे तुकडे

यांवरील लेखन लक्षात घेता 'पुस्तक' या शब्दाची व्युत्पत्ती ध्यानात येते. मानवी संस्कृतीच्या ज्या अवस्थेत आपले विचार स्वतःसाठी व भावी पिढीसाठी जतन करून ठेवावेत ही कल्पना माणसाच्या मनात रुजली, त्या मानवी संस्कृतीच्या अतिप्राचीन अवस्थेपासून कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात ग्रंथाचे अस्तित्व आढळते. मुद्रण कला अस्तित्वात आल्यानंतर वाचनसाहीत्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध होवू लागले.

**ग्रंथालये**:

ग्रंथालये म्हणजे पुस्तकाचे एकत्रीकरण होय. वर्तमान काळात ग्रंथालयाचा अर्थ हा ग्रंथ संग्रहांपुरता मर्यादित नसून ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग महत्वाचा झालेला आहे.विकसित संस्कृतीची ग्रंथनिर्मिती म्हणजे मानव जातीचा अमूल्य असा खजिना असतो. म्हणून ग्रंथाचे भविष्यासाठी जतन करावयाचे असते. ते काम ग्रंथालये करतात. ग्रंथातून म्हणजे कागदाच्या माध्यमातून आतापर्यंत ज्ञानवाहन होत राहिले.भविष्यकाळात माध्यमाचे हे स्वरूप कदाचित बदलत चालले आहे. कारण अधिक योग्य, टिकाऊ व संचयास उपयुक्त अशी माध्यमे विकसित होत आहेत. जुन्या साधनाचे किंवा माध्यमाचे नव्या साधनामध्ये रुपांतर होत आहेत. अश्या परिस्थितीत आजची सर्वच प्रकारची ग्रंथालये नव्या तंत्रज्ञानाचे आव्हान स्विकारून त्या दिशेने वाटचाल करीत आहेत. अश्या बदलामधून संस्कृती व तिचा विकास यांचे दर्शन होते आणि या साऱ्या बाबी ग्रंथालयाच्या सहकार्याने सादर होतात. कारण ग्रंथालय म्हणजे भूतकाळातील व भविष्यकाळातील संस्कृतीमधील पूल असतो. अश्या ग्रंथालायातच आज महत्वाचे वाटत नसलेले वाचन साहित्यही जतन करून ठेवले जाते. कारण भविष्य काळातील एखाद्या वाचकास ते महत्वाचे वाटू शकते व त्या वाचन साहित्याचे वाचन होवू शकते.

**ग्रंथालयाचे साधारणतः पुढीलप्रमाणे उद्देश असतात.**

१.मनोरंजन, माहिती व ज्ञान देण्यासाठी सार्वजनिक व्यवस्था निर्माण करणे.

२.साक्षरतेचा प्रचार व प्रसार करणे.

३.समाजातील सर्वच स्तरातील जनतेमध्ये लोकशिक्षण देणे.

४.अनौपचारिक शिक्षण, अल्पशिक्षित, नवसाक्षर व शेती-उद्योजक यांना साहित्य पुरवणे.

५.माहिती केंद्र म्हणून कार्य करणे.

**ग्रंथालयातील वाचन साहित्याचे प्रकार**:

ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे असो साधारणतः ग्रंथालयात पुढील प्रकारचे वाचन साहित्य असते.

१.ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, प्रबंध, विविध विषयाचे संशोधन ग्रंथ. विविध प्रकल्प.

२. नियतकालीके : दैनिके, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, अर्धवार्षिक, आणि वार्षिके.

३. शब्दकोश, विश्वकोश, नकाशे, डीरेक्टरी

४. ई-बुक्स, ई-जर्नल. डाटाबेस.

५. सी.डी./डी.व्ही.डी., इंटरनेट.

**ग्रंथालयाचे प्रकार**:

ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह आणि ग्रंथालयाचा वाचकवर्ग यांच्या स्तरानुसार ग्रंथालयाचे प्रकार पडतात. त्यातील तीन मुख्य प्रकार आहेत.

**१.शैक्षणिक ग्रंथालय:**

या प्रकार अंतर्गत सर्वच विद्यापीठ स्तरीय ग्रंथालये, सर्व महाविद्यालय स्तरीय ग्रंथालये, सर्व शाळेच्या स्तरावरील ग्रंथालयाचा समावेश शैक्षणिक ग्रंथालयात होतो.

**२. सार्वजनिक ग्रंथालय:**

या प्रकारामध्ये भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय, प्रत्येक राज्यातील राज्यस्तरीय ग्रंथालय, विभागीय ग्रंथालय, जिल्हास्तरीय ग्रंथालय, तालुकास्तरावरील ग्रंथालये, ग्राम पातळीवरील ग्रंथालयाचा समावेश सार्वजनिक ग्रंथालयात होतो .

**३. विशेष ग्रंथालय:**

ग्रंथालयाच्या या प्रकारामध्ये अंधासाठी असलेले ग्रंथालये, रुग्णासाठी असलेले ग्रंथालये, कैद्यासाठी असलेली ग्रंथालये, संशोधनासाठी असलेली ग्रंथालये इत्यादीचा समावेश विशेष ग्रंथालयात होतो.

**ग्रंथालय ही सामाजिक व शैक्षणिक संस्था आहे.**

ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे. त्याच प्रमाणे शैक्षणिक संस्था देखील आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वांच्या सेवेस ग्रंथालय सदैव तत्पर असते. ह्या संस्था ग्रंथाच्या, वाचन साहित्याच्या माध्यमातून आपल्याला ज्ञान देण्याचे महत्वपूर्ण कार्य सतत करीत असतात. पुरातन काळापासून ज्ञानाचा संग्रह करणे, तसेच ज्ञानाचा प्रसार करणे हा ग्रंथालयाचा मुख्य उद्देश आहे. त्याच बरोबर व्यावसायिक कौशल्य विकसित करणे, सामाजिक व सांस्कृतिक मूल्याचे जतन करण, संवर्धित करणे हे प्रमुख कार्यही ग्रंथालयाचे आहे. ग्रंथालय ही एक सेवाभावी संस्था असून ती इतर संस्था पेक्षा वेगळी आहे. आपल्या जवळील वाचन साहित्याने समाजाला जागृत करण्याचे पवित्र कार्य ग्रंथालय करते. विविध प्रकारच्या वाचकांच्या गरजा लक्षात घेवून ग्रंथसंग्रह वाढवणे, तो समृद्ध करणे आणि तो ग्रंथसंग्रह वाचकांना उपलब्ध करून देणे हेच ग्रंथालयाचे फलित होय. म्हणूनच समाजाच्या प्रगतीला बऱ्यापैकी आधार आहे.

**ग्रंथालयाचा वाचकवर्ग:**

१.शैक्षणिक प्रकारच्या ग्रंथालयात साधारणतः विद्यार्थी, शिक्षक, संशोधक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थांचे प्रतिनिधी, माजी विद्यार्थिनी अश्या स्वरूपाचा वाचक वर्ग असतो.

२.सार्वजनिक ग्रंथालयात वाचक वर्गासाठी कोणत्याही प्रकारची अट नसते. बालकापासून ते वयोवृद्ध व्यक्तीपर्यंत, कोणत्याही जाती धर्माचे लोक, कोणत्याही वयातील लोक सार्वजनिक ग्रंथालयाचे वाचक असतात.

३.विशेष ग्रंथालय हे खास वाचकांसाठी असते. या ग्रंथालयाचे ते वाचक असतात. उदा. अंध व्यक्ती, कैदी,

**वाचनाचे महत्व:**

जगातील प्रत्येक राष्ट्रात साक्षरता अभियान चालू आहे. प्रत्येक मानवाला अक्षर ओळख व्हावी व ती टिकून राहण्यासाठी वाचन साहित्य मिळावे आणि ते वाचण्यास प्रवृत्त व्हावे असे प्रयत्न सर्व पातळ्यावर होत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर, युनो या संघटनेच्या जनरल असेम्बलीने ई.स.

१९९० हे वर्ष आंतरराष्ट्रीय साक्षरता वर्ष म्हणून जाहीर केले. कारण प्रत्येक बालकाला लिहिणे-वाचणे याची आणि प्रौढांना वाचनाची संधी मिळणे याची ग्वाही मिळणे आवश्यक झाले आहे. भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांनी ई.स. १९९० हे साक्षरता वर्ष व त्यानंतरचे दशक हे साक्षरता दशक म्हणून जाहीर केले. आता साक्षरते साठी प्रयत्न चालू असतानाच वाचनाची सवय वाढविणे आणि तिचे महत्व ठसविणे यासाठी प्रयत्न होणे अत्यंत आवश्यक झाले आहे.पूर्वीच्या पिढीत वाचनाची सवय जास्त होती कारण तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात उपलब्ध नव्हते. टी.व्ही. सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे ग्रंथ हेच मनोरंजन व ज्ञान मिळविण्याचे साधन होते. म्हणून आजच्या जाणत्या नागरिकांना ग्रंथ वाचनाची सवय लागावी, टिकावी व वाढावी यासाठी प्रयत्न केले पाहिजे, नँशनल बुक ट्रस्ट, इंडिया यांनी ई.स. २००१-२००२ हे पुस्तक वर्ष म्हणून जाहीर करून यासंबाधित प्रयत्नांना हातभार लावलेला आहे.

सतत बदलत राहणाऱ्या व अधिकच गुंतागुंतीच्या होणाऱ्या परिस्थितीत मानव, वाचनावाचून राहू शकत नाही, कारण अश्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी वाचन हा उपयुक्त मार्ग आहे. वैयक्तिक संग्रहातील किंवा ग्रंथालयातील वाचन साहित्याचे वाचन सर्व देशातील सर्व वयाच्या माणसांना आवश्यक वाटू लागले. वाचन हे अनेक जीवन स्त्रोतापैकी महत्वाचा स्त्रोत आहे. मात्र सामाजिक बदलानुसार नेहमीच वाचन व वाचन सवय यावर परिणाम होताना दिसते. जेव्हा सामाजिक बदल अधिक वेगाने होतो तेव्हा वाचनाची सवयही वेगाने वाढते आणि वाचन ही अत्यावश्यक गरज बनते. कारण वेगाने बदलणाऱ्या सामाजिक परिस्थितीत ज्ञान व माहितीस अधिक मागणी येते.पूर्ण विकसित समाजाचा सभासद असणारा मनुष्य वाचनाची सवय जाणीवपूर्वक जोपासतो. कारण त्याला स्वतःचा दर्जा वाढवायचा असतो आणि तो टिकवायचा असतो.म्हणूनच त्याला सतत वाचन करावे लागते व आजूबाजूच्या घटनाची व परिस्थितीची माहिती करून घ्यावी लागते. म्हणूनच विकसित समाजातील व्यक्तींना माहिती, करमणूक व समाधान करणाऱ्या वाचन साहित्याची निवड करण्याचे स्वातंत्र्य असावे लागते. ग्रामीण भागापेक्षा नागरी जीवनात तणाव जास्त असतात.म्हणून तेथील व्यक्तींना करमणूक करणारे वाचन साहित्य गरजेचे वाटते. यातून वाचन सवय विकसित होते. ज्ञान व माहिती मिळवणे, तणाव कमी करणारा आनंद, मनोरंजन मिळविण्यासाठी वाचनाची सवय असणे व त्यासाठी ग्रंथालयाची मदत घेणे आवश्यक आहे. सतत बदलणाऱ्या व अधिकच गुंतागुंतीच्या होणाऱ्या परिस्थितीत मानव वाचनाशिवाय राहू शकत नाही. कारण अश्या परिस्थितीत टिकून राहण्यासाठी वाचन हा उपयुक्त मार्ग आहे.

वाचन म्हणजे नेमकी कोणती प्रक्रिया आहे यावर आजच्या वाचकांनी काही प्रमाणात विचार करणे आवश्यक आहे. कोणत्याही भाषेतील अक्षरे, शब्द, वाक्य यांच्यावरून फक्त नजर फिरवणे म्हणजे वाचन नसते. तर नजरे समोर दिसणाऱ्या अक्षराच्या, वाक्याच्या व शब्दाच्या अर्थाचे आकलन होवून त्यावर स्वतःची प्रतिक्रिया स्वतःशी नोंदवणे म्हणजे वाचन होय असे म्हणता येईल. अक्षर ओळखीनंतर ज्ञान मिळविण्यासाठी आपोआपच अश्या वाचनाचा आधार घेतला जातो.कारण वाचन हे आत्मविकास करणारे आहे.स्व ची ओळख करून देणारे आहे. पण वाचन हे

साध्य नसून साधन आहे. वाचनामुळे माहितीच्या गरजांचे तर समाधान होतेच; पण ज्या व्यक्ती आपल्याशी प्रत्यक्ष बोलू शकत नाही, त्या ग्रंथाच्या माध्यमातून आपले विचार संप्रेषित करू शकतात. त्या ग्रंथाच्या वाचनामुळे ते इतरांपर्यंत पोहोचू शकतात त्यावरून नव्या ज्ञानाची किंवा माहितीची निर्मितीही होवू शकते. जगातील उत्तम शिक्षक आपल्यासोबत नसले तरी, ग्रंथ वाचनातून अधिकाधिक शिकता येते व परत परत अनुभवता येते.

आजच्या युवकांमध्ये वाचनाबाबत रुची निर्माण व्हावी; कारण ग्रंथ अथवा कोणतेही वाचन साहित्य हे आनंद व ज्ञान देतात. याची जाणीव आजच्या वाचकांमध्ये होणे गरजेचे आहे, त्यासाठी ग्रंथालय पातळीवर ग्रंथ सप्ताह, वाचकमेळावे, किंवा लेखक मेळावे, अश्या प्रकारचे कार्यक्रम व उपक्रम राबविणे आवश्यक आहे. यामुळे परिसरातील लोकांना, वाचकांना अश्या कार्यक्रमात एकत्र आणता येतात. व यातून ग्रंथाचा व वाचन सवयीचा प्रचार व प्रसार करता येतो.

**वाचन विषयक गरज पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयातील सुविधा:**

ग्रंथालयाच्या वाचन कक्षाचे आगळेवेगळे महत्व आहे. कारण वाचन कक्षात दीर्घकाळ वाचन करणारे वाचक असतात, त्याची ही गरज लक्षात घेवून आरामदायी उपकरणे ठेवावी लागतात. वाचकांना आरामदायक वाटेल अश्या खुर्च्या, टेबल, नैसर्गिक प्रकाश, पंखे, उन्हाळ्यात गर्मीचा त्रास वाचकांना होवू नये म्हणून वातानुकुलीत व्यवस्था इत्यादीची व्यवस्था आजची बहुतेक ग्रंथालये करत असतात. याशिवाय वाचन कक्षात स्वच्छता, प्रसन्न वातावरण ठेवावे लागते जेणेकरून वाचक दीर्घकाळ वाचन करू शकतील. नियतकालिकांचे अंक व वृत्तपत्रे या विभागात वाचक बसून वाचत असतात. सार्वजनिक ग्रंथालयाचा वाचन विभाग सभासदेतर वाचकांसाठी खुला असतो. शैक्षणिक ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष असतो. अभ्यासिका असते. व शिक्षकांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष असतो. वाचनकक्षात अथवा अभ्यासिकेत वाचन करणाऱ्या वाचकांची दैनिक नोंदवही असते. त्याठिकाणी येणाऱ्या वाचकांना प्रथम नोंदवहीत नोंद करावी लागते. त्यासाठी ग्रंथालय कर्मचाऱ्याला सदैव जागरूक राहावे लागते.

**निष्कर्ष:**

वाचनाने माणूस ज्ञानी होतो आणि त्याला पुस्तकाच्या रूपाने एक नवीन मित्र मिळतो. वाचन ही एक कला आहे. वाचन माणसाला माणूस बनविते, जीवनाला एक नवी दिशा देते, विचार करायला शिकविते, अंतर्मुख करविते, त्याचप्रमाणे जीवनात योग्य- अयोग्य काय याची जाणीव करून देते. आपल्या समाजात 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण प्रचलित आहे.वाचन आपल्या सर्वांसाठी चांगले आहे. त्यामुळे आपण सर्वांनी पुस्तके वाचली पाहिजेत आणि इतरांनाही ती वाचायला सांगावीत. आपली वाचन संस्कृती जपण्यासाठी आपल्याला हे करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनाही वाचनासाठी प्रवृत्त करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या आवडत्या विषयापासून वाचनाला सुरुवात करावी आणि वाचनाचा आनंद घ्यावा.पूर्वीच्या काळी इतर विषयांची पुस्तके मिळण्याचे ठिकाण होते – ग्रंथालय. आजच्या आधुनिक युगातही ग्रंथालये विकसित झालेली आहेत. वाचनालयात वाचनासाठी साहित्य, पुस्तके, निबंध लेखन पुस्तके असे अनेक प्रकार आहेत. पण आज या पुस्तकांची जागा इंटरनेटने घेतली आहे. कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, भावनिक; आणि

मानसिकदृष्ट्या व्यक्तीला परिपक्व होण्यास वाचन मदत करते. प्रत्येक पुस्तक आपल्याला शिकण्यासाठी एक नवीन संधी देत असते. पुस्तके वाचल्याने आपले ज्ञान वाढते. पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांपासून ते खगोलशास्त्रज्ञांपर्यंत, प्रत्येकजण त्यांच्या ज्ञानाच्या प्रगतीसाठी पुस्तकांवर अवलंबून होते. वाचन म्हणजे आपल्या जीवनाला उन्नत करणारी गोष्ट ज्यामुळे आपली बुद्धिमत्ता अधिक वाढते. तसेच माणसाचे जीवन फुलविण्यात वाचनाचा सर्वात मोठा वाटा असतो.

**ग्रंथसूची:**

१. जैन, प्रकाश., डाखोळे,पी., देशपांडे, द., खेडकर, अ. (२००९). *सुलभ ग्रंथालयशास्त्र* (द्वितीयावृत्ती). नागपूर: विश्व प्रकाशन.

२. भट, शरद गो. (२००८). *इलेक्ट्रानिक माहिती साधने* (प्रथम आवृत्ती). नागपूर: पिंपळापुरे बुक प्रकाशन.

३. पवार, एस.पी., बडकते, स., पवार, आर.जी., जाधव, सु. (२०१२). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र* (चौथी आवृत्ती). कोल्हापूर: फडके प्रकाशन.

४. काळे, किशोर. (२०१०). *माहिती सेवा व साधने* (प्रथम आवृत्ती). नागपूर: विश्व प्रकाशन.

५. नरगुंदे, रेवती. (२०१३). *ग्रंथालय आणि सामाजिक विकास* (प्रथम आवृत्ती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

६. कोण्णूर, एम.बी.., कोण्णूर, सुजाता., माणगावकर, उष:प्रभा. (२००८). *ग्रंथालय व माहीतीशास्त्र कोश* (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड पब्लिकेशन.